# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः23.05.2024 वारःगुरुवार

---

1. नवनवीन संकल्पना राबवून प्रशासनातील अधिकाऱ्यांनी राज्याच्या विकासात योगदान देण्याचं राज्यपाल रमेश बैस यांचं आवाहन
2. पुण्यातल्या कल्याणीनगर अपघातप्रकरणी अल्पवयीन आरोपीच्या वडिलांना 24 तारखेपर्यंत पोलिस कोठडी, मुलाची बालसुधारगृहात रवानगी
3. घाटकोपर फलक दुर्घटना चौकशीसाठी विशेष तपास पथक
4. बुलडाणा जिल्ह्यात नवनवीन रोजगार सुरु करण्यासाठी विशेष प्रयत्न, यंदा आतापर्यंत 841 कोटींची निर्यात आणि
5. उजनी जलाशयात बुडालेली नाव सापडली, मात्र सहा जणांचा अद्याप ठाव नाही

**राज्यपाल विकास**

प्रशासनातील अधिकाऱ्यांनी नवनवीन संकल्पना राबवून राज्याच्या विकासात योगदान द्यावं असं आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी महाबळेश्वर इथं प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत केलं. मध्यान्ह भोजनाचा दर्जा नियमितपणे तपासून ते चांगल्या दर्जाचं मिळेल याची दक्षता घ्यावी तसंच मुलांच्या क्रीडा विकासावर शाळांमध्ये जाणीवपूर्वक भर देण्याची सूचनाही राज्यपालांनी यावेळी केली. सातारा जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी तसंच जिल्ह्यातल्या उजाड माळरान असलेल्या ठिकाणी वृक्ष लागवडीचं नियोजन करण्यासह विविध सूचना राज्यपालांनी केल्या.

**राज्यपाल रुग्णालय**

महाबळेश्वर इथल्या ग्रामीण रुग्णालयात गरजु आणि गरीब जनतेवर चांगल्या पद्धतीने उपचार केले जातात. या रुग्णालयाच्या सोयी सुविधा आणि औषधांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची ग्वाही राज्यपाल रमेश बैस यांनी काल या ग्रामीण रुग्णालयाची पाहणी केल्यानंतर दिली.

**राज्यपाल**

रेड क्रॉस सोसायटीच्या पाचगणी इथल्या रुग्णालयासाठी २८ लाख ९७ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल रेड क्रॉस सोसायटीच्या प्रतिनिधींनी राज्यपाल रमेश बैस यांचे आभार मानले आहेत. राजभवनात सोसायटीच्या प्रतिनिधींसोबत यासंदर्भात एक बैठक झाली.

**बुद्ध पौर्णिमेनिमित्त**

आज बुद्ध पौर्णिमा. या निमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान बुद्धांनी दिलेली अहिंसा, शांती आणि करुणेची

शिकवण व्यक्ती, समाज तसंच राष्ट्रांना नेहमीच मार्गदर्शक आहे. आजही शिकवण पूर्वीपेक्षा अधिक प्रासंगिक आहे, असं राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**पोर्शे**

पुण्यातील कल्याणी नगर वाहन अपघात प्रकरणी अल्पवयीन मुलाचे वडील विशाल अगरवाल याला २४ मेपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश सत्र न्यायालयानं काल दिले. तसंच अल्पवयीन मुलाला मद्य पुरवठा करणारे बार मालक, व्यवस्थापक नितेश शेवानी आणि जयेश बोनकर यांना सुद्धा तीन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश सत्र न्यायालयानं दिले. विशाल अग्रवाल याला काल न्यायालयात आणण्यात आलं त्यावेळी वंदे भारत संघटनेच्या कार्यकर्त्यांनी त्याच्यावर शाई फेकण्याचा प्रयत्न केला. या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं.

दरम्यान अल्पवयीन आरोपीची पाच जूनपर्यंत बाल सुधारगृहात रवानगी करण्याचा आदेश बाल न्याय मंडळानं काल रात्री दिला. आरोपीला देण्यात आलेल्या जामिनाचा पुनर्विचार करण्यात यावा यासाठी पोलिसांनी सत्र न्यायालयात अर्ज केला होता. मात्र सत्र न्यायालयानं पोलिसांना बाल न्याय मंडळासमोर अर्ज करण्याची सूचना केली होती.

**बाल**

18 वर्षे पूर्ण नसतील तर बालगुन्हेगार म्हणून गंभीर गुन्ह्यातून आरोपीची सुटका होण्यावर प्रतिबंध घालण्यासाठी ही वयोमर्यादा 16 वर्षे करावी अशी मागणी महाराष्ट्र पोलीस मित्र सघटनेचे अध्यक्ष राजेद्र कपोते यांनी केली आहे. याबाबतचं निवेदन त्यांनी मुख्यमत्री एकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलं आहे.

**आरटीओ**

पुण्यातील कल्याणीनगरमधील अपघाताच्या पार्श्वभूमीवर पुणे प्रादेशिक परिवहन विभागाच्या वतीने विनानोंदणी रस्त्यावर धावत असलेल्या वाहनांवर कारवाई सुरू केली आहे. अशी वाहनं आढळल्यास त्याची विक्री करणाऱ्या वितरकाचा व्यवसाय परवाना निलंबित करण्यात येईल. शहरातील वितरकांना विनानोंदणी वाहन ग्राहकांना देऊ नये, अशा सूचना करण्यात आल्या आहेत अशी माहिती प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी दिली. पुणे पोलिसांनी मंगळवारी रात्री मद्यपान करून गाडी चालवणाऱ्या चालकांवर नाकाबंदी करून कारवाई केली. या कारवाईत ८५ मद्यपी चालकांना दंड ठोठावण्यात आला.

**नाव**

उजनी धरणाच्या जलाशयात एक प्रवासी नाव उलटून झालेल्या दुर्घटनेतील सहा जणांचा शोध अद्याप लागलेला नाही. राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकांना काल ही नाव सापडली आहे मात्र त्यात बसलेल्या लोकांचा थांग लांगलेला नाही. नावेमध्ये सहाजण होते, राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाची दोन पथकं अथकपणे शोध घेत आहेत.

**घाटकोपर होर्डिंग**

घाटकोपर जाहिरात फलक अपघात प्रकरणी मुंबई गुन्हे शाखेनं 6 अधिकाऱ्यांचं विशेष तपास पथक स्थापन केलं आहे. या अपघातात आत्तापर्यंत 17 जणांचा मृत्यू झाला असून 75 जण जखमी झाले आहेत. फलकासाठी जबाबदार असलेल्या कंपनीचे मालक भावेश भिंडे याच्या निवासस्थानाची या पथकानं झडती घेतली आणि कंपनीतील काही कर्मचाऱ्यांची चौकशी केली. गेल्या आठवड्यात मुंबई गुन्हे शाखेनं भावेश भिंडे याला राजस्थानमधील उदयपूर इथं पकडून मुंबईत आणलं. 13 मे रोजी झालेल्या वादळात मुंबईतील घाटकोपर भागातील पेट्रोल पंपावर एक भलामोठा फलक कोसळला होता.

**रोजगार**

बुलडाणा जिल्ह्यात नवनवीन रोजगार सुरु करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याच्या उद्देशानं जिल्हाधिकारी डॉक्टर किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली काल एक बैठक घेण्यात आली. जिल्ह्यात निर्यातक्षम उद्योग उभारणीसाठी समोर येणाऱ्या प्रत्येक उद्योजकाला सर्वतोपरी सहकार्य केलं जात आहे. गेल्या वर्षी 768 कोटींची निर्यात झाली, तर यंदा आतापर्यंत 841

कोटींची निर्यात झाली आहे. जिल्ह्याच्या या कामगिरीमुळं उत्कृष्ट निर्यातीसाठी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी नामांकन केलं जाणार आहे. जिल्ह्यात एक जिल्हा, एक उत्पादन अंतर्गत कापूस आणि सीड हब निश्चित करण्यात आलं आहे. बियाणांचं  हब तयार करण्यासाठी बियाणे कंपन्यांनाही सहभागी करून घेतल्याची माहिती पाटील यांनी दिली.

**<u>वसई विजयोत्सव दिन</u>**

नरवीर चिमाजी अप्पा यांच्या शौर्यानं प्राप्त झालेल्या वसई किल्लाचा विजय दिन दरवर्षी प्रमाणे आज बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जात आहे. यंदा या विजयोत्सव दिनाचं हे 286 वं वर्ष आहे. वसई किल्ल्याचा इतिहास, तिथली वास्तू आणि पर्यटन, लोकसंस्कृती तसंच खाद्यसंस्कृती ही जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचावी या उद्देशानं ‘वसई विजयोत्सव दिन’ या एकदिवसीय कार्यक्रमाचं आयोजन दरवर्षी केलं जातं.   वज्रेश्वरी देवीच्या मंदिरातून मशाल प्रज्वलित करून ती मोटार सायकल फेरीद्वारे वसईच्या पारनाक्याजवळ आणण्यात येईल. त्यानंतर पारनाका ते नरवीर चिमाजी अप्पा स्मारकापर्यंत मशाल मिरवणूक काढली जाणार आहे.

ई-शिधापत्रिका

ऑनलाइन पोर्टलद्वारे शिधापत्रिका देण्याची सुविधा रत्नागिरी जिल्हा पुरवठा विभागाकडून सुरू करण्यात आल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी रोहिणी रजपूत यांनी दिली. रत्नागिरी तालुक्यातल्या खेडशी गावातल्या विकास पवार यांना पहिल्या ई-शिधापत्रिकेचं वितरण करण्यात आलं. पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिकांचं कार्यक्षम वितरण होण्यासाठी या उपक्रमाचा उपयोग होणार असून, सरकारी कार्यालयाला प्रत्यक्ष भेट न देता रेशन कार्डसाठी सोयीस्करपणे अर्ज करून ते मिळवणं शक्य होणार आहे. त्यासाठी rcms.mahafood.gov.in या संकेतस्थळाला भेट देण्याचं आवाहन रजपूत यांनी केलं आहे.

**<u>जागतिक तंबाखू विरोधी</u>**

जागतिक तंबाखू विरोधी दिनाचं औचित्य साधून वाशिम  इथल्या शासकीय परिचर्या प्रशिक्षण विद्यालयात काल राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. जिल्हा रुग्णालय वाशिम अंतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर अनिल कावरखे यांच्या मार्गदर्शनाखाली  तंबाखू आणि  तंबाखूजन्य पदार्थामुळे मानवी शरिरावर होणारे दुष्परिणाम याबाबत भित्तीचित्र आणि रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली. तसंच  तंबाखू  आणि तंबाखूजन्य पदार्थांमुळे होणारे विविध आजार, नियंत्रण कायदा याबाबत मार्गदर्शन करण्यात आलं.

**<u>आधारकार्ड-</u>**

दहावी,बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आधारकार्ड अद्ययावत असणं  गरजेचं  आहे. त्यामुळे टपाल खात्याच्या ग्रामीण विभागातर्फे ग्रामीण भागांत आधारकार्ड केंद्र सुरू आहेत. या आधारकार्ड केंद्रांवर जाऊन विद्यार्थ्यांनी आपलं  आधारकार्ड अद्ययावत करून घेण्याचं आवाहन पुणे ग्रामीण डाकघर अधिक्षक बी.पी.एरंडे यांनी केलं  आहे. ग्रामीण भागांतील शाळांमध्येही विशेष  आधारकार्ड शिबिर भरवायचं  असल्यास, पुणे ग्रामीण डाकघर विभागाच्या क्रमांकाशी संपर्क साधता येईल.

**<u>वसंत व्याख्यानमाला</u>**

वाई इथं आयोजित वसंत व्याख्यानमालेच्या १०८ व्या ज्ञानसत्राचा  समारोप नुकताच गणपती घाटावर झाला. लोकमान्य टिळक स्मारक  संस्थेमार्फत ही व्याख्यानमाला दरवर्षी सलग 21 दिवस आयोजित केली जाते. राज्यात सध्या सुरू असलेल्या मोजक्याच शतकोत्तर व्याख्यानमालांपैकी ही एक महत्त्वाची व्याख्यानमाला आहे.

**<u>पायरी</u>**

किल्ले रायगडवरचा पायरी मार्ग आज आणि उद्या बंद राहणार आहे. शिवराज्याभिषेक सोहोळ्यानिमित्त मोठ्या संख्येनं शिवभक्त गडावर येतात. मात्र गडावर काही ठिकाणी दरड कोसळून अपघात घडण्याची शक्यता असल्यानं धोकादायक सुटे दगड काढले जाणार आहेत. त्यासाठी पायरी मार्ग बंद ठेवला जाणार आहे.

दरम्यान, मांडवा_अलिबाग ते _गेटवे_ऑफ_इंडिया या जलमार्गावरील वाहतूक 26 मे ते 31 ऑगस्ट दरम्यान खबरदारी म्हणून बंद ठेवण्यात येणार आहे. जलमार्गानं मुंबईहून अलिबागला येण्यासाठी केवळ दीड तास लागतो.

**बीड दुष्काळ**

बीड जिल्ह्यातील वडवणी, धारुर आणि अंबाजोगाई या तालुक्यांमध्ये गंभीर स्वरुपाचा दुष्काळ तर उर्वरीत बीड, गेवराई, शिरुर, माजलगाव, केज, परळी, आष्टी आणि पाटोदा या तालुक्यातील महसुली मंडळामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी घोषित केली आहे. त्यानुसार विविध सवलती लागू करण्यास शासनानं मान्यता दिली आहे.

**हवामान**

नैऋत् मोसमी पाऊस काल  दक्षिण अरबी समुद्राचा काही भाग, मालदीवचा आणखी काही भाग, कोमोरिन क्षेत्र आणि दक्षिण बंगालच्या उपसागरात तसंच अंदमान-निकोबार बेटं आणि अंदमान समुद्राच्या आणखी काही भागात पुढे  सरकला आहे. येत्या दोन दिवसात राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. या काळात उत्तर-मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.